महाराष्ट्र शासन

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

# सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सिन्नर, जि. नाशिक

**यांचे कार्यालय, 2 रा मजला, व्यापारी सहकारी बँक इमारत,सिन्नर.**

e-mail : ar_sinnar@rediff.com

---

जा.क्र. वि.3/शहा विकास/कलम 88/सन 2017. दिनांक 27/11/2017.

वाचावे :-
1) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 88.
2) शहा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., शहा ता. सिन्नर जि. नाशिक या संस्थेचा 2016-17 या कालावधीचा लेखापरिक्षण अहवाल.
3) मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांचेकडील पत्र जा.क्र.लेप/शहाविका/ विनिर्दिष्ट अह/कार्य/सन 2017, दिनांक 11/09/2017.
3) श्री. एस.पी.वावीकर, प्रमाणित लेखापरिक्षक, यांचेकडील शहा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., शहा ता. सिन्नर या संस्थेचा दिनांक 01/04/2016 ते 31/03/2017 या कालावधीतील अपहाराबाबतचा विनिर्दिष्ट अहवाल.

ज्याअर्थी, शहा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., शहा ता. सिन्नर ही संस्था (यापुढे जिचा उल्लेख संस्था असा केला आहे) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व त्याखालील नियम 1961 अन्वये नोंदविण्यांत आलेली सहकारी संस्था आहे. आणि,

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व त्याखालील नियम 1961 मधील तरतुदी, संस्थेचे मंजुर उपविधीतील तरतुदीनुसार, तसेच शासन व मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या परिपत्रकीय सूचनांनुसार सदर संस्थेचे कामकाज पार पाडणे संस्थेच्या संचालक मंडळावर व अधिकारी / कर्मचारी वर्गावर बंधनकारक आहे. आणि,

ज्याअर्थी उपरोक्त संस्था ही या कार्यालयाच्या कार्यकक्षेत येत असुन, संस्थेचे दिनांक 01/04/2016 ते 31/03/2017 या कालावधीचे वैधानिक लेखापरिक्षण संस्थेच्या वार्षिक सर्व साधारण सभेतील मंजूर ठरावानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 81 (1) (अ) अन्वये श्री. एस. पी. वावीकर, प्रमाणित लेखापरिक्षक यांनी केलेले असुन, लेखापरिक्षण अहवाल 31/08/2017 रोजी सर्व संबधितांना सादर केलेला असल्याचे नमुद करण्यात आलेले आहे. तसेच सदर लेखापरिक्षण अहवाल कालावधीतील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 81 (5 ब) अन्वये विनिर्दिष्ट अहवाल (अफरातफर विशेष अहवाल) देखील सादर करणेत आलेला आहे. सदरचा विनिर्दिष्ट अहवाल उपरोक्त वाचावे क्रमांक 3 दिनांक 11/9/2017 रोजीच्या पत्रान्वये दिनांक 03/10/2017 रोजी या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. आणि,

ज्याअर्थी सदर संस्थेचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 81 अन्वये दिनांक 01/04/2016 ते 31/03/2017 या कालावधीचे लेखापरिक्षण पुर्ण करण्यात आलेले असुन लेखापरिक्षण अहवालासोबत प्राप्त झालेला विनिर्दिष्ट अहवाल या कार्यालयामार्फत छाननी करण्यात आला. विनिर्दिष्ट अहवालातील एकंदर निष्कर्ष पाहता संस्थेचे सचिव यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व त्याखालील नियम 1961 मधील तरतुदी, संस्थचे मंजूर उपविधीतील तरतुदी शासन व मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या परिपत्रकीय सूचना यानुसार आपली कर्तव्ये व जबाबदारी यांचे पालन केलेले नसल्याने, संस्थेच्या निधीचा दुरुपयोग होवून संस्थेचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झालेले आहे. आणि,

ज्याअर्थी, संस्थेचे वैधानिक लेखापरिक्षणासाठी नियुक्त प्रमाणित लेखापरिक्षक यांनी सादर केलेल्या विनिर्दिष्ट अहवालात स्वयंस्पष्ट अभिप्राय नमुद करुन कायदेशीर कारवाई करणेची शिफारस केलेली आहे. आणि,

ज्याअर्थी, संस्थेच्या विनिर्दिष्ट (विशेष अहवाल) अहवालांत नमुद गंभीर दोष व संस्थेच्या झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत संबधितांना जबाबदार धरुन कायदेशीर कारवाई होणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, शहा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., शहा ता. सिन्नर संस्थेच्या दिनांक 01/04/2016 ते 31/03/2017 या कालावधीतील लेखापरिक्षणातील विशेष अहवालात नमुद केलेल्या आर्थिक नुकसानीची व्याप्ती निश्चित करुन त्याबाबत रकमांची जबाबदारी निश्चित करणे आणि नुकसानीचे व्यक्तीनिहाय प्रमाण व जबाबदारी निश्चित करणेसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 88 अन्वये कारवाई होणे आवश्यक असल्याने व तशी माझी खात्री झाल्याने, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## -:: आ दे श ::-

मी, अर्चना सौंदाणे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सिन्नर, जि. नाशिक मला महाराष्ट्र शासन, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र. सीएसएल-1493/1162/सीआर-47/15-सी, दिनांक 07/08/1993 व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 चे कलम 88 (1) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **शहा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., शहा ता. सिन्नर या संस्थेच्या** दिनांक 01/04/2016 ते 31/03/2017 या कालावधीच्या विशेष अहवालात नमुद करण्यात आलेल्या सोबतच्या परिशिष्ट अ मध्ये नमुद मुद्यांवर संस्थेच्या झालेल्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी संबधितांवर निश्चित करणेसाठी **श्री. सर्जेराव पुंजाजी कांदाळकर, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, नांदगांव,** जि.नाशिक यांची प्राधिकृत चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे.

प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी प्रस्तुतच्या आदेशासोबत जोडलेल्या परिशिष्ट अ मधील मुद्यांचे अनुषंगाने नमुद केलेल्या व्यवहारामध्ये संस्थेस झालेल्या आर्थिक नुकसानीचे संबधीत व्यक्तीनिहाय प्रमाण निश्चित करुन, जबाबदारी निश्चित करण्यासाठी योग्य ती कायदेशीर कार्यपद्धती अवलंबवावी व जबाबदारी निश्चित करावी. तसेच संस्थेस झालेल्या आर्थिक नुकसानीचे भरपाईबाबत आवश्यक ते आदेश करावेत.

प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी सदरची चौकशी या आदेशाच्या तारखेपासून 6 (सहा) महिन्याचे आंत पूर्ण करावी व नुकसान भरपाईबाबतचे आदेश तीन प्रतीत या कार्यालयास सादर करावेत. प्राधिकृत चौकशी अधिकारी यांचे मेहनतानाचे आदेश अलाहिदा पारित करण्यात येतील.

सदरचा आदेश आज दिनांक 27 नोव्हेंबर, 2017 रोजी माझ्या सहीनिशी व कार्यालयीन मुद्रा ठसवून दिला आहे.

ठिकाण : सिन्नर.
दिनांक : 27 नोव्हेंबर, 2017

( अर्चना सौंदाणे )
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, सिन्नर, जि.नाशिक.

प्रति :-

1) चेअरमन/सचिव, शहा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., शहा ता. सिन्नर, जि. नाशिक.
   2/- त्यांना कळविणेत यते की, त्यांनी चौकशी अधिकारी यांना चौकशीकामी आवश्यक असणारे सर्व दप्तर उपलब्ध करुन देऊन आवश्यक ते सर्व सहकार्य करावे.
2) श्री. सर्जेराव पुंजाजी कांदाळकर, प्राधिकृत चौकशी अधिकारी, तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, नांदगांव, जि. नाशिक.
3) चेअरमन / कार्यकारी संचालक, नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., नाशिक.
4) लेखापरिक्षक, सहकारी संस्था, सिन्नर
5) विभागीय अधिकारी, नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., नाशिक, (सिन्नर मार्केट यार्ड).
6) श्री. एस. पी. वावीकर, प्रमाणित लेखापरिक्षक, सहकारी संस्था, नाशिक.

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-

1) मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक.
2) मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक.
3) जिल्हा विशेष लेखापरिक्षक (वर्ग-1), सहकारी संस्था, नाशिक.

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, सिन्नर, जि.नाशिक.

# परिशिष्ट-अ

<u>संस्थेचे नांव :-शहा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., शहा ता. सिन्नर,जि.नाशिक.</u>

**1) सचिव येणे खाती नांवे टाकून रोख शिल्लक रक्कमेचा अपहार रु. 5,97,132.94 :-**

अ) संस्थेचे सचिव म्हणून कार्यरत असतांना तत्कालिन सचिव श्री. विजय भानुदास ताजणे यांनी विशेष अहवालात नमुद केले प्रमाणे संस्थेच्या रोज किर्दीला दिनांक 3/9/2016 रोजी रु. रोख शिल्लक रू. 3000/- असुन, संस्थेच्या कर्जदार सभासदंकडून रोखीने कर्ज वसुली पोटी जमा झालेली रक्कम रु. 5,42,055/- अशी एकुण रक्कम रु. 5,45,055/- रक्कमेपैकी रु. 5,41,000/- स्वत:च्या नांवावर येणे बाकी दाखवून रोख शिल्लक घटवून रोख रक्कम रु. 5,41,000/- चा अपहार केलेला आहे.

ब) दिनांक 9/9/2016 रोजी संस्थेच्या कर्जदार सभासदंकडून रोखीने कर्ज वसुली पोटी जमा झालेली रक्कम रु. 16,020/- व संस्थेच्या धान्य विभागाकडील शिल्लक रक्कम रु. 40,112.94 अशी एकुण रक्कम रु. 56,132.94 स्वत:च्या नांवावर येणे बाकी दाखवून रोख शिल्लक घटवून रोख रक्कमेचा अपहार केलेला आहे.

**२) जॉ. ए. वर्गणी देणे दिले नांवे टाकुन रोख रक्कम कमी करुन केलेला अपहार रु. 2,33,361/-**

संस्थेचे तत्कालीन सचिव श्री. विजय भानुदास ताजणे यांनी दिनांक 12/04/2016 रोजी रु. 33,661/- व दिनांक 20/05/2016 रोजी रु. 2,00,000/- असे एकुण 2,33,361/- इतकी रक्कम नाशिक जिल्हा देखरेख सहकारी संघ यांच्या नांवे जा. ए. वर्गणी पोटी नांवे टाकलेली आहे. मात्र सदर रक्कमेच्या भरणा केलेल्या बाबतच्या पावत्या किंवा भरणा चलन संस्थेच्या दप्तरी दाखल केलेले नाही व हातावरील रोख रक्कम घटवून रोख रक्कमेचा अपहार केलेला आहे.

**३) थकबाकीदार सभासदांना नव्याने कर्ज देऊन संस्थेच्या निधीचा केलेला अपहार रू. 1,72,000/-**

संस्थेच्या (१) श्री. प्रतिक अ.पा.क. रमेश रखमा जाधव यांना दिनांक 13/7/2014 रोजी खरीप कर्ज रू. 72,000/- व दिनांक 19/10/2014 रोजी रब्बी कर्ज रू. 20,000/- (२) सौ. अनुसया लक्ष्मण पवार यांना दिनांक 31/7/2014 रोजी ऊस कर्ज रु. 40,000/- व (3) सौ. सिताबाई चंद्रभान वाकचौरे यांना दिनांक 28/9/2015 रोजी रब्बी कर्ज रु. 76,000/- अश्या एकुण ३ थकबाकीदार सभासदांना पुन्हा कर्ज वाटप करुन संस्थेच्या रक्कमेचा अपहार केलेला आहे.

(सविस्तर तपशिलास्तव विशेष अहवालाची मुळ प्रत माहितीस्तव सोबत जोडण्यात येत आहे)

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, सिन्नर, जि. नाशिक.